नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 27/04/2020 (सोमवार)
(सकाळ)

## अवैध गावठी मोहाफुल दारू अड्ड्यात धाड
## कोंढाळी पोलीसांची कारवाई

दिनांक 27/04/2020 रोजी कोंढाळी पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, कोंढाळी हददीत मौजा माहुरखोरा शिवार येथे काही इसम मोहा फुलाची गावठी दारू तयार करीत आहेत. अश्या मिळालेल्या गुप्त माहितीवरून कोंढाळी पोलीसांनी दिनांक 26/04/2020 चे 16.00 वा. ते 16.30 वा. दरम्यान मौजा माहुरखोरा शिवारातील जंगलात दारूबाबत प्रोव्हीशन रेड केली असता काही इसम अवैधरीत्या मोहाफुलाची गावठी दारू गाळत असतांना मिळुन आले. यातील आरोपी क्र. 1) जयराम पालसिंग राठोड, वय 28 वर्ष, 2) मधुकर मोहन जाधव, वय 26 वर्ष व 3) बळीराम प्रमसिंग जाधव, वय 42 वर्ष, सर्व रा माहुरखोरा यांच्या ताब्यातुन 100 लीटर मोहफुल गावठी दारू किंमत 30,000/-रू. 2) मोहफुल रसायन सडवा प्रत्येकी 150 लीटर एकुण सडवा 900 लीटर किंमत 1,80,000/-रू. 3) 2 प्लास्टीक ड्रम किंमत 6,000/-रू. चा माल व इतर हातभट्टी साहीत्य किंमत 2,000/-रू. असा एकुण कि. 2,18,000/-रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी पो. स्टे. कोंढाळी येथे आरोपीतांविरूद्ध कलम 65 (ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोहवा सुनील बन्सोड 9764090208 हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर